## महत्त्वाचे

### दुचाकी अपघातात दोघांचा मृत्यू

**बोधेगाव (प्रतिनिधी)** – शेवगाव-गेवराई राज्य मार्गावर बालमटाकळी शिवारात सोमवारी (दि.२) दुपारी तीन वाजेच्या सुमारास दोन दुचाकींची समोरासमोर धडक झाली. या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला, नितीन नामदेव केसभट (वय ४५) हे बोधेगावकडे मोटारसायकलवरून येत होते, तर संजय वसंत चव्हाण (वय २४) हा बोधेगावहून लग्न समारंभ उरकून गावी कुंभेजळगाव येथे मोटारसायकलवर जात होता. शेवगाव-गेवराई राज्यमार्गावरिल बालमटाकळी सुकळी शिवारात दोन मोटरसायकलची समोरासमोर जोरदार धडक झाल्याने दोन्ही मोटारसायकल चालक गंभीर जखमी झाले. जखमींना शेवगाव येथे ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी हलविले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मृत घोषित केले.

### जनता दरबारात तक्रारींचा ओघ झाला कमी : आ. विक्रम पाचपुते

**श्रीगोंदा (तालुका प्रतिनिधी)** – तालुक्यातील प्रशासन चांगल्या पद्धतीने काम करत असल्याने जनता दरबारात येणाऱ्या तक्रारींचा ओघ कमी झाला आहे मात्र, प्रशासनावर अंकुश ठेवण्यासाठी दरमहा जनता दरबार सुरूच ठेवणार असल्याचे आमदार विक्रम पाचपुते यांनी सोमवारी (दि.२) माध्यमांशी बोलताना सांगितले. श्रीगोंद्यात सोमवारी आ.पाचपुते यांनी चौथा जनता दरबार घेतला, याप्रसंगी ते बोलत होते. ते म्हणाले मागील महिन्यात चोंडीला मंत्रिमंडळाची बैठक होती, त्यामुळे एप्रिल महिन्यात जनता दरबार घेता आला नाही. जून, जुलैमध्ये विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन असल्याने ऑगस्टमध्ये जनता दरबार होईल. पहिल्या जनता दरबारात ३७५ तक्रारी आल्या होत्या. अधिकाऱ्यांनी यातील बहुतेक तक्रारींचा निपटारा केला. त्यामुळे यावेळी फक्त १७५ तक्रारी आल्या. यामध्ये शेत रस्ते, शिवपाणंद रस्ते यांचे प्रमाण अधिक होते. पण तहसीलदार बदलल्याने निकाल देणे थांबले होते. आता या कामास गती येईल. पंचायत समितीमध्ये नरेगा अंतर्गत गाईगोठा, विहिरी व इतर व्यक्तिगत लाभाच्या कामासंदर्भात तक्रारी होत्या. त्यासाठी एक कक्ष तयार केला होता. जवळपास बहुतेक तक्रारींवर प्रशासनाने सकारात्मक भावनेने काम केले आहे. यावेळी तहसीलदार प्रवीण मुदगल, गटविकास अधिकारी राणी फराटे, मुख्याधिकारी पुष्पगंधा भगत, कृषी अधिकारी शशीकांत गांगर्डे आदी उपस्थित होते.

### मुख्यमंत्री फडणवीस १५ जूनला राळेगणसिद्धीत

**पारनेर (तालुका प्रतिनिधी)** – तालुक्यातील राळेगणसिद्धी येथे १५ जूनला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थित पुरस्कार वितरण व विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन होणार असल्याची माहिती राळेगणसिद्धी परिवाराने दिली. जेष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त राळेगणसिद्धी परिवाराच्यावतीने सेवाभावी संस्था आणि सामाजिक कार्यकर्त्यांना स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी संस्थेच्यावतीने श्री. अण्णासाहेब हजारे सामाजिक गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. दरम्यान, या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आढावा घेतला. यावेळी अण्णा हजारे, आमदार काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, दत्ता आवारी, सरपंच जयसिंग मापारी, राहुल शिंदे पाटील, सुनील थोरात, सरपंच लाभेश औटी आदी उपस्थित होते.

### मेडिकल असोसिएशनच्या तालुकाध्यक्षपदी औटी

**पारनेर (तालुका प्रतिनिधी)** – पारनेर तालुका मेडिकल असोसिएशनच्या तालुकाध्यक्षपदी डॉ. संदीप औटी, तर उपाध्यक्षपदी डॉ. राजेंद्र वाकळे यांची निवड झाली आहे. नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा पार पडला. संघटनेचे माजी अध्यक्ष डॉ. भाऊसाहेब खिलारी, उपाध्यक्ष डॉ. सोमेश्वर आढाव, सचिव संदीप तांबे, खजिनदार जितेंद्र खामकर यांनी आपल्या पदाची सूत्रे नूतन अध्यक्ष डॉ. औटी, उपाध्यक्ष डॉ. राजेंद्र वाकळे, सचिव डॉ. पांडुरंग थोरात, सहसचिव डॉ. सुशील पादिर, खजिनदार डॉ. अरविंद नांगरे यांच्याकडे सोपवली. दरम्यान, अहिल्यानगर येथील डॉ. अभिजीत पाठक, डॉ. श्याम तारडे, डॉ. मोहम्मद माजिद, डॉ. गजानन काशीद आणि डॉ. गणेश गीते यांना विशेष गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी सभासदांच्या गुणवंत मुलांचा प्रशस्तिपत्रक ऑणि बक्षीस देऊन गौरव करण्यात आला, तसेच ज्येष्ठ व्यावसायिकांना जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला. डॉ. सोमेश्वर आढाव, डॉ. संदीप तांबे, डॉ. संदीप औटी, डॉ. पांडुरंग थोरात, डॉ. अजित लंके यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. रफिक सय्यद, डॉ. प्रवीण दिवटे, डॉ. शत्रुघ्न मगर, डॉ. भंडारे, डॉ. अशोक सरोदे, डॉ. किसन हांडे, डॉ. मनोहर हांडे, डॉ. राधाकृष्ण ठुबे, डॉ. मनोहर रांधवन, डॉ. किरण रोहकले, डॉ. सुरेश शिंदे यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### कामगारांच्या वेतनाचा प्रश्न सोडविणार : शिवाजी औटी

**पारनेर (तालुका प्रतिनिधी)** – साखर कामगारांच्या प्रश्नांबाबत त्रिपक्षीय वेतन मंडळात सविस्तर बोलणार असून, त्यातून कामगारांच्या वेतनाचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न असेल, असे प्रतिपादन साखर कामगार नेते शिवाजीराव औटी यांनी केले. देवीभोयरे येथील क्रांती शुगर अ‍ॅण्ड पॉवर लिमिटेडचे २० कामगार एकाच दिवशी सेवानिवृत झाले. त्यांचा सेवापूर्ती सत्कार समारंभ पार पडला. कारखान्यातील इंजिनिअरिंग विभागातील सुरेश साळवे, समभाऊ दिवटे, प्रकाश दळवी, विठ्ठल बौधरी, आनंदा बेलोटे, चंद्रकांत बेलोटे, रवी सोनवणे, भीवा मावळे, भाऊसाहेब शिंदे, यादव भालेकर, तसेच शेतकी विभागातील शिवाजी बेलोटे, संपत ढोमे, उत्पादन विभागातील बाबाजी बांगर, भाऊसाहेब वाढवणे, गोविंद परंडवाल, कोंडीभाऊ करपे, बजरंग साळवे, सुरक्षा विभागातील ज्ञानदेव सरडे, बाळू खोसे, स्टोअर विभागातील दिलीप साबळे सेवानिवृत्त झाले. संचालक नरेंद्र दुर्वे म्हणाले, क्रांती शुगर अ‍ॅण्ड पॉवर लिमिटेड सातत्याने शेतकरी व कामगारांचे हित जोपासत असते. या पुढेही कामगारांनी आपल्या अडचणी आम्हाला सांगाव्यात, आम्ही आमच्या परीने सातत्याने मदत करू. तुम्ही पुढील आयुष्य आनंदी जगावे हीच आमची सदिच्छा असल्याचेही ते म्हणाले. यावेळी कारखान्याचे संचालक नरेंद्र दुर्वे व कामगार नेते औटी, तसेच कारखान्याचे मुख्य इंजिनिअर, प्रॉडक्शन मॅनेजर, मुख्य शेतकी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, डेप्युटी चीफ केमिस्ट, सुरक्षा अधिकारी आदी उपस्थितीत होते.


### हिंगणी दुमाला येथे हनुमान चालिसा

**श्रीगोंदा (तालुका प्रतिनिधी)** – तालुक्यातील हिंगणी दुमाला येथे हनुमान चालिसा पठणासह हिंदू जागर आणि शिवप्रेरणा मंत्राचा उपक्रम गेल्या दीड वर्षापासून सातत्याने सुरू आहे. गावातील हनुमान मंदिरामध्ये दर शनिवारी सकाळी नऊ वाजता हा कार्यक्रम पार पडतो. उपक्रमासाठी विक्रम वाखारे, सागर शिंदे, बाळा गायकवाड, अनिल गाजरे, सुनील यादव, धनंजय वाखारे, रवी कनिंगध्वज, भिवाजी लांडगे, अरुण चक्रे यांच्यासह तरुणांनी पुढाकार घेतला आहे. उद्योजक गणेश संपत वाखारे कार्यक्रमासाठी महाप्रसाद, हार, फुले व पूजेचे साहित्य नियमितपणे पुरवतात.

# वांगदरी येथील घरकूल प्रकल्प राज्यात प्रथम

## केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

**श्रीगोंदा (तालुका प्रतिनिधी)** – पंतप्रधान आवास योजनेंतर्गत वांगदरी ग्रामपंचायतीने उभारलेल्या महाआवास घरकुल प्रकल्पास राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे. बालेवाडी क्रिडा संकुलात झालेल्या शानदार सोहळ्यात मंगळवारी (दि. ३) केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या शुभहस्ते, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रेय भरणे, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत महाआवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार श्रीगोंदा पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी राणी फराटे, विस्तार अधिकारी मोशीन मालजपते, सरपंच संजय नागवडे व ग्रामविकास अधिकारी लक्ष्मण मुरकुटे यांच्याकडे प्रदान करण्यात आला.



यावेळी प्रसंगी नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे, उपसरपंच छाया मासाळ, माजी सरपंच आदेश नागवडे, महेश नागवडे, शिवाजी चोरमले, अशोक पारखे व सर्व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

सरपंच संजय नागवडे म्हणाले, सहकार महर्षी नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे व जिल्हा परिषदेच्या माजी सभापती व जिल्हा बँकेच्या संचालिका अनुराधा नागवडे यांच्या मार्गदर्शनाने ग्रामपंचायत हद्दीतील महाराष्ट्र शासनाची ४० गुंठे जागा ग्रामपंचायतीकडे खास बाब म्हणून वर्ग करून घेतली. या जागेवर प्रधानमंत्री आवास योजनेतून आदर्श घरकुल प्रकल्प उभा करण्यात आला. ग्रामपंचायतीने ३६ घरकुलांचे दर्जेदार काम करत सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या. या प्रकल्पासाठी एक कोटी २० लाख रुपये खर्च झाला असून; प्रधानमंत्री आवास योजनेतून व गवंडी प्रशिक्षण योजनेतून रुपये ८५ लाख निधी प्राप्त झाला. पुणे येथील रेल फॉर फाउंडेशन यांनी २२.५० लाखांचा निधी दिला. काही रक्कम ग्रामपंचायतीचे इतर फंडातून खर्च केली. उर्वरित रक्कम राजेंद्र दादा नागवडे यांनी उपलब्ध करून दिली. प्रकल्पासाठी पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, राज्याचे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, तालुक्याचे माजी आमदार बबनराव पाचपुते तसेच जिल्हा परिषदेचे सहकार्य लाभले. यापूर्वी सदर प्रकल्पास विभागीय पातळीवर द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार मिळालेला आहे. प्रकल्पासाठी ग्रामविकास अधिकारी मुरकुटे यांते सहकार्य लाभले.

# गॅस पाइपलाईनने लावली रस्त्याची वाट

## एक वर्षापासून काम सुरु; वाहनचालकांसह नागरिक त्रस्त

**श्रीगोंदा (तालुका प्रतिनिधी)** – पालिका हद्दीतील मुख्य बायपास रस्ता सिटी गॅस पाइपलाईनसाठी एक वर्षापूर्वी चार ठिकाणी खोदून ठेवल्याने रस्त्याची अक्षरशः वाट लागली आहे. रस्त्यावरून ये-जा करताना वाहनचालकांसह नागरीकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. चांगले रस्ते उखडला असताना पालिकेने केवळ बघ्याची भूमिका घेतल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी, पाच वर्षापूर्वी शहरातील सोळा रस्ते पालिकेने तेहतीस कोटी रुपये खर्च करून ठेकेदार एजन्सी मार्फत डांबरीकरण केले. त्याच्या कामाच्या गुणवत्तेचा प्रश्न त्याच वेळी उपस्थित झाला होता. त्यानंतर रस्त्यावर खड्डे पडले. पारगाव रस्ता तर कायम खचलेलाच राहिला. हे सर्व होत असताना भारत गॅस पाइपलाईन शहरातून बायपास मार्गे, शनि चौक, मांडवगण मार्गे रस्त्याच्या मधून गेली. यासाठी गॅस कंपनीने सात कोटी रक्कम भरली होती. यानंतर निविदा काढून या खोदलेले रस्त्याचे पुन्हा डांबरीकरण केले पण तो रस्त्यावर पुन्हा परत सहा महिन्यात खड्डे पडले. ते ठेकेदार एजन्सीने बुजवले नाहीत. नंतर मात्र गव्हाणवाडी ते श्रीगोंदा रस्त्याचे



काम पायाभूत विकास मंडळाकडून सुरू करण्यात आले. त्यामुळे शहरातील या रस्त्याची डागडुजी ठेकेदाराने केली नाही.पालिकेनेही त्याकडे दुर्लक्ष केले आहे.

काष्टी रोड ते पारगाव रोड या बायपास रस्त्यातून दुसऱ्यांदा सिटी गॅस पाईप टाकण्यात आले. त्यासाठी केवळ चार ठिकाणी खड्डे करून यंत्राच्या साह्याने जमिनीखालून पाईप टाकण्यात आले. यासाठी एक वर्षापूर्वी केलेला डांबरी रस्ता चार ठिकाणी खोदला आहे. पण तो पुन्हा व्यवस्थित करण्यात आला नाही. मुख्य बायपास रस्त्यावर आजही हे खड्डे तसेच आहेत. पालिका प्रशासन या सर्वांकडे दुर्लक्ष करत आहे.

दरम्यान, पालिकेने रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी अशी मागणी नागरीकांनी केली आहे.

# रेडी नदीवरील पूल दुरुस्तीची मागणी

**शेवगाव (तालुका प्रतिनिधी)** – तालुक्यातील प्रमुख जिल्हा मार्गावरील देवटाकळी येथील रेडी नदीवरील पूलावरुन दरवर्षी पावसाळ्यात अनेकदा पाणी वाहते व वाहतूक खंडित होते. नागरीकांसह, विद्यार्थ्यांना पूलावरुन ये-जा करताना मोठी कसरत करावी लागते. रुग्णांना तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी घेऊन जाण्यासाठी अनेक अडचणी येतात. दुरुस्ती व्हावी यासाठी लोकप्रतिनिधींनी लक्ष द्यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते शेषराव आपशेटे यांनी प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे, तालुक्यातील भातकुडगाव ते दहिगाव ने, शेवगाव हद्दीतील शहरटाकळी, देवटाकळी, मठाचीवाडी,भावीनिमगाव, रांजणी,ढोरसडे या गावातील



नागरिकांना भातकुडगाव फाटा मार्गावरील देवटाकळी येथील रेडी नदीच्या पुलावरून शेवगाव, कुकाणे, नेवासा, अहिल्यानगर, संभाजीनगर येथे ये-जा करावी लागते. देवटाकळी येथील रेडी नदीवरील कमी उंचीचा हा पूल सुमारे ५० वर्षांपूर्वीचा आहे. दरवर्षी पावसाळ्यात पुलावरून पाणी वाहत असते. हा रस्ता पावसाळ्यामध्ये अनेकदा दोन-दोन दिवस बंद असतो. त्यामुळे दळणवळण बंद होते. या मार्गावर रहदारी अधिक असल्यामुळे बऱ्याच वर्षांपासून नदीवरील पुलाची उंची वाढविण्यासाठी मागणी केली जात आहे. दोन वर्षांपूर्वी याच पुलावरून पावसाच्या पाण्यामध्ये चार चाकी टेम्पो वाहून गेला होता. सुदैवाने जीवितहानी झाली नाही. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी पुलाची उंची वाढवण्यासह दुरुस्ती करण्यात यावी, असेही निवेदनात म्हटले आहे.

# रेणुकामाता मल्टीस्टेटचे भालेराव यांचा दिल्लीत डंका

## मंडी हाऊसमध्ये स्तुत्य उपक्रम; उच्च पदावरील अडीचशे मान्यवरांची उपस्थिती

**शेवगाव (तालुका प्रतिनिधी)** – श्री रेणुका माता मल्टीस्टेट को ऑपरेटिव्ह अर्बन क्रेडिट सोसायटी या संस्थेचे संस्थापक ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. प्रशांत भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली श्री रेणुकामाता मल्टिस्टेट संस्थेच्या व दिल्ली येथे कार्यरत असलेल्या महाराष्ट्राच्या सुकन्या, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या धनश्री देशमुख यांच्या संयुक्त विद्यमाने दिल्लीच्या मंडी हाऊसमध्ये नुकताच एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.

डॉ. भालेराव व त्यांच्या सहकाऱ्यांनी राज्यातील विविध क्षेत्रातील ज्येष्ठ, श्रेष्ठ आणि उद्योग व्यवसाय व नोकरीनिमित्त देशात उद्या देशाबाहेर ठिकठिकाणी विखुरलेल्या सीनिअर आयएएस केडरच्या महाराष्ट्रीयन मान्यवरांना एका मंचावर अनौपचारिकरीत्या एकत्र आणले. या मान्यवरांच्या सहवासातून, विचारमंथनातून राज्याबद्दलची अस्मिता जागृत




सिनेअभिनेते पद्मश्री अशोक सराफ यांच्याबरोबर 'एक उनाड संध्याकाळ' कार्यक्रमात गप्पा मारत, विविध विषयांवर संवाद साधण्यात आला.

व्हावी; त्यांच्या ज्ञानाचा लाभ पुढील पिढीला व्हावा, या उदात्त हेतूने उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

भालेराव म्हणाले, उपक्रमाला उपस्थित असलेल्या उच्च पदस्थांमुळे आमचा उत्साह द्विगुणित झाला आहे. या कार्यक्रमामुळे झालेली वैचारिक देवाणघेवाण सर्वांना प्रेरणादायी ठरणार आहेत.

सोहळ्याचे अध्यक्ष, महाराष्ट्र दहशतवादविरोधी माजी पथकप्रमुख, २६/११च्या मुंबई हल्ल्यातील आघाडीवरील लढवय्ये तथा राष्ट्रीय तपास संस्थेचे (एनआयए) विद्यमान महासंचालक सदानंद दाते यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी केंद्रिय क्रीडा विभागाच्या माजी सचिव, लोकसेवा आयोग्याच्या विद्यमान सदस्या सुजाता चतुर्वेदी, न्यूयॉर्कमध्ये भारतीय कौन्सिल जनरल तसेच मालदीवमध्ये भारताचे उच्चायुक्त म्हणून परराष्ट्र सेवेत उत्तम कामगिरी बजावलेले, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे माजी सदस्य तथा, राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाचे विद्यमान सल्लागार, एक सिद्धहस्त लेखक ज्ञानेश्वर मुळे, तामिळनाडूत सेक्रेटरी म्हणून कार्यरत असलेले सतिषकुमार घोरमाडे, शालेय शिक्षण सचिव आनंदराव पाटील, आदी उच्च पदावर कार्यरत असलेल्या अडीचशे मान्यवरांची या सोहळ्यास उपस्थिती होती. यावेळी नगर दक्षिणचे खासदार निलेश लंके, नाशिकचे खासदार भास्कर भगरे, नेवासे विधानसभेचे माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, येथील रेणुका परिवार सदस्य डॉ. अरविंद पोटफोडे उपस्थित होते.

# गोरक्षकाला मारहाण करणाऱ्यांना तातडीने अटक करा; तहसीलदारांना निवेदन

## पाथर्डीतील विविध संघटनांची मागणी

**पाथर्डी (तालुका प्रतिनिधी)** – तालुक्यातील तिसगाव येथील गोरक्षकाला जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना तातडीने अटक करून कडक कारवाई करावी, अशी मागणी विश्व हिंदू परिषद, बजरंग दल गोरक्षा समिती, हिंदू रक्षा युवा मंच आदी संघटनांनी निवेदनाद्वारे प्रशासनाकडे केली आहे. याबाबतचे निवेदन तहसीलदार डॉ. उद्धव नाईक व गटविकास अधिकारी शिवाजी कांबळे यांना देण्यात आले आहे.

यावेळी विश्व हिंदू परिषदेचे किशोर परदेशी, बाळासाहेब गिते, नानासाहेब पालवे, आशुतोष शर्मा, दत्तात्रय गिते, महेश अंतरकर, आदिनाथ लगड, किशन फतपुरे, सोमनाथ बंग, सारंग मंत्री, तेजस पटवा, समर्थ रोडी, रवींद्र मोहिते, राजू हराळ, प्रकाश बालवे, सोमनाथ दुधाने, प्रवीण फुंदे आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे, तिसगाव येथे भारत लिपारे या गोरक्षकावर जीवघेणा हल्ला झाला. नगर दक्षिण विभागातील सर्वात मोठा कत्तलखाना तिसगाव येथे चालू आहे. या कत्तलखान्याकडे प्रशासनाचे गांभीर्याने लक्ष नाही. तालुक्यातील गोरक्षक आपले काम गोमातेच्या रक्षणासाठी प्रामाणिकपणे करत आहेत. गोमांस तस्करीमध्ये गोरक्षक कायदेशीर मार्गाने प्रतिबंध करतात. या कामामध्ये अडथळा नको म्हणून अवैध कत्तलखाने चालकांकडून यापूर्वीही वेळोवेळी गोरक्षकांवर खोटे गुन्हे दाखल करण्याचे प्रकार घडले आहेत. तिसगाव येथील अवैध पाच कत्तलखाने त्वरित बंद करून गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करावेत. राज्य शासनाने संमत केलेल्या गोरक्षण कायद्याची तालुक्यात काटेकोर अंमलबजावणी व्हावी, खोटे गुन्हे दाखल होऊ नये व गोरक्षकांना संरक्षण मिळावे; अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# स्व. मुंडे यांच्या पुतळ्याचे लवकरच मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अनावरण

## आ. राजळे; पाथर्डी शहराची वाटचाल स्मार्ट सिटीकडे

**पाथर्डी (तालुका प्रतिनिधी)** – पाथर्डी शहराची स्मार्ट सिटीकडे वाटचाल सुरु आहे. प्रशासकीयदृष्टीने सोईच्या व शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या नगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, नवीन पोलिस ठाणे व पोलिस वसाहत इमारतीचा लोकार्पण सोहळा, तसेच लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत केले जाणार असल्याची माहिती आ. मोनिका राजळे यांनी दिली.

पाथर्डी येथे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी धनंजय बडे, दिगांबर भवार, अभय आव्हाड, डॉ. मृत्युंजय गर्जे, अशोक चोरमले, नंदकुमार शेळके, बंडू बोरुडे, बजरंग घोडके, मुख्याधिकारी संतोष लांडगे, रमेश गोरे, डॉ. रमेश हंडाळ, अनिल बोरुडे, नामदेव लबडे, नारायण पालवे, सुनील ओव्हळ, मुकुंद गर्जे, बबन बुचकुल, डॉ.जगदीश मुने, जगदीश काळे, नितीन गर्जे, नाना बालवे, सचिन वायकर, सुभाष बोरुडे, रमेश काटे, भिमराव पालवे, रमण लाहोटी, मंगल कोकाटे, दुर्गा भगत, ज्योती शर्मा, अक्षय काळे, महेश काटे उपस्थित होते.

आ. राजळे म्हणाल्या, तालुक्यात क्रीडा संकुल व्हावे, यासाठी प्रयत्नशील होते. जागेची अडचण आली तरी एक वर्षात क्रीडा संकुल उभारले जाईल. सोलर प्रकल्पासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी १ कोटी रुपयांचा निधी दिला असून भूमिगत गटार योजनेच्या कामामुळे नागरिकांची गैरसोय झाली असली तरीही लवकरच रस्त्यांची कामे पूर्ण होतील. शहराच्या पाणी पुरवठा योजनेचे काम प्रगतीपथावर असून तांत्रिक बिघाडामुळे एक आठवडा ते रेंगाळले होते. पालिका प्रशासनाने पाणीपुरवठा विस्कळीत होऊ नये व शहरात स्वछता राखावी यासाठी दक्ष राहावे. ठेकेदारांनी कामाचा दर्जा चांगला राहिल याची दक्षता घ्यावी.

# सुपा येथे वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण

**पारनेर (तालुका प्रतिनिधी)** – राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्यावतीने प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व डी.टी.एड शिक्षकांना वरिष्ठ व निवडश्रेणी प्रशिक्षण देण्यात येत आहे. पारनेर तालुक्यातील सुपा येथील न्यू इंग्लिश स्कूल येथे दहा दिवसीय प्रशिक्षणास सोमवारपासून (दि.२) सुरुवात झाली असून वरिष्ठ श्रेणीसाठी ३७ तर निवड श्रेणीसाठी ८३ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले आहेत.

प्रशिक्षणाच्या उद्घाटनप्रसंगी अधिव्याख्याता लक्ष्मण सुपे, ज्येष्ठ शिक्षण विस्ताराधिकारी कांतिलाल ढवळे, केंद्रप्रमुख गवळी,श्री.येवले आदी उपस्थित होते.

राज्यात एकाच वेळी २ ते १२ जून या कालावधीत वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण



आयोजित केले असून या प्रशिक्षणाच्या प्रत्येक दिवशी परिपाठ, दृकश्राव्य प्रदर्शन, तासिका आणि स्वाध्यायाचे नियोजन करण्यात आले आहे. दिवसभराच्या चार तासिकांना जोडून १० गुणांची चाचणी व शेवटच्या तासिकेला दहा दिवसात पाच स्वाध्याय घेतली जाणार आहेत. एकूण प्रशिक्षणात ३०० पैकी गुणांचे मूल्यमापन होणार असून प्रशिक्षणार्थींना पास होण्यासाठी किमान ५० टक्के गुण मिळविणे गरजेचे आहे. प्रशिक्षणासाठी सुलभक म्हणून प्रविण झावरे, विशाल पाचर्णे, ज्ञानेश्वर इंगळे, प्रवीणचंद्र गुंजाळ, सतीश चव्हाण तर तालुका समन्वयक म्हणून किसन शिरसाट काम पाहणार आहेत.